नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २९२ Issue - 292 | वार सोमवार दि. १० मार्च २०२५ Blow- Monday Date 10 March 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...

### पाण्याची टाकी स्वच्छ करताना चार कामगारांचा गुदमरून मृत्यू

मुंबई : नागपाडा येथील डिमटीम कर मार्गावरील बिस्मिल्ला स्पेस या इमारतीच्या तळघरातील पाण्याची टाकी स्वच्छ करण्यासाठी काही कामगार रविवारी साडेबाराच्या सुमारास टाकीत उतरले असता गुदमरल्याने चार कामगारांचा मृत्यू झाला तर एका कामगारावर उपचार सुरू आहेत.

बिस्मिल्ला स्पेस या निर्माणाधीन इमारतीतील तळघरात असलेल्या पाण्याच्या टाकीची अनेक महिन्यांपासून स्वच्छता झाली नव्हती. त्यामुळे टाकी स्वच्छ करण्याचे कंत्राट सोसायटीने एका खाजगी कंपनीला दिले. त्या कंपनीचे कामगार टाकी स्वच्छ करण्यासाठी रविवारी दुपारी खोल टाकीत उतरले. मात्र, टाकीतील अपुऱ्या प्राणवायूमुळे काहीवेळातच त्यांचा श्वास गुदमरला. या दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी मदतकार्य हाती घेतले. त्याचबरोबर, रुग्णवाहिका, पोलीस आणि संबंधित पालिका विभाग कार्यालयातील कर्मचाऱ्यांनीही दुर्घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या जवानांनी पाच कामगारांना बाहेर काढले आणि उपचारासाठी नजीकच्या जे. जे रुग्णालयात दाखल केले. मात्र, या घटनेत चार कामगारांचा मृत्यू झाला. हसीबुल शेख (वय १९), राजा शेख (वय २०), जिउल्ला शेख (वय ३६), इमांदू शेख (वय ३८) अशी मृत कामगारांची नावे आहेत. त्यातील पुरहान शेख (वय ३१) हा वाचला असून त्याच्यावर जे. जे. रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# भारताने चॅम्पियन्स ट्रॉफीवर कोरलं नाव

## न्यूझीलंडवर मिळवला ऐतिहासिक विजय




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुबई : भारतीय संघाने ऐतिहासिक कामगिरी करत चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे जेतेपद पटकावले आहे. भारताने न्यूझीलंडचा अंतिम सामन्यात ४ विकेट्सने पराभव केला. जडेजाने ४९व्या षटकातील अखेरच्या चेंडूवर विजयी चौकार लगावत संघाला विजय मिळवून दिला. भारताने रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखाली संपूर्ण स्पर्धेत एकही सामना न गमावता ही स्पर्धा आपल्या नावे केली आहे. रोहित शर्माने ७६ धावा करत सामन्याचा सामनावीर ठरला.

भारताच्या विजयासह टीम इंडिया चॅम्पियन्स ट्रॉफीचे जेतेपद तिसऱ्यांदा पटकावणारा पहिला संघ ठरला. यासह भार-ताने गेल्या १० महिन्यात दुसरी आयसीसी स्पर्धा जिंकत ट्रॉफी आपल्या नावे केली.

न्यूझीलंडने दिलेल्या २५२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताचा कर्णधार रोहित शर्माने वादळी खेळी करत संघाच्या विजयाच्या पाया रचला. रोहित शर्माने ८३ चेंडूत ७ चौकार आणि ३ षटकारांसह ७६ धावा केल्या, तर शुबमन गिलने ५० चेंडूत एका षटकारासह ३१ धावा केल्या. श्रेयस अय्यर आणि अक्षर पटेलच्या भागीदारीने भारताला सामन्यात कायम ठेवलं. श्रेयस अय्यर ६२ चेंडूत २ चौकार २ षटकारांसह ४८ धावा करत बाद झाला. तर अक्षर पटेलने ४० चेंडूत १ चौकार १ षटकारासह २९ धावा करत बाद झाला. तर राहुल आणि हार्दिकने भारताला विजयाच्या उंबरठ्यावर नेले. तर रवींद्र जडेजाने विजयी चौकारासह भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या अंतिम सामन्यात ३४ धावांची नाबाद खेळी खेळून टीम इंडियाला विजयाच्या उंबरठ्यावर ठेवत राहुल नाबाद परतला. यावेळी त्याला हार्दिक पंड्याचीही साथ लाभली ज्याने १८ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. किवी संघाकडून मायकेल ब्रेसवेल आणि मिचेल सँटनर यांनी प्रत्येकी २ विकेट घेतले.

न्यूझीलंड संघाने नाणेफेक गमावत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण पुन्हा एकदा भारताच्या फिरकी चौकडीने आपली कामगिरी चोख बजावली. भारताच्या फिरकी विभागाने चांगली कामगिरी करत धावांवर अंकुश ठेवला आणि न्यूझीलंडला २५१ धावांवर रोखलं. रचिन रवींद्र आणि विल यंगने किवी संघाला अर्धशतकी भागीदारी रचत चांगली सुरूवात केली. पण रोहित शर्माची रणनिती आणि भारताच्या फिरकी विभागाने टीम इंडियाला सामन्यात परत आणले. न्यूझीलंडकडून रचिन रवींद्रने ३७ धावा, डॅरिल मिचेलने ६३ धावा आणि ब्रेसवेलने ५३ धावांची खेळी केली.

भारताकडून कुलदीप यादव आणि वरूण चक्रवर्तीने २ विकेट्स तर रवींद्र जडेजा-मोहम्मद शमीने १-१ विकेट घेतली. रोहित शर्माने कमालीचे नेतृत्त्व करत संघाला विजय मिळवून दिला.

# उपमुख्यमंत्री अजित पवार राज्याचा आज अर्थसंकल्प सादर करणार




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महायुतीला मिळालेल्या विक्रमी यशानंतर नवीन सरकारच्या पहिल्याच अर्थसंकल्पात शेतकरी, लाडक्या बहिणी व सर्वसामान्यांना दिलासा मिळणार का, याचीच उत्सुकता आहे. शेतकरी सन्मान योजनेत तीन हजार रुपयांची वाढ करण्याचे आधीच जाहीर करण्यात आले असले तरी लाडक्या बहिणींचे अनुदान २१०० रुपये करण्याचा निर्णय घेतला जातो का, याकडे महिला वर्गाचे लक्ष लागले आहे.

उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार आज, सोमवारी दुपारी २ वाजता विधानसभेत राज्याचा २०२५-२६चा अर्थसंकल्प सादर करतील. 'नमो शेतकरी सन्मान योजने'त वार्षिक तीन हजार रुपये वाढ करून ते १५ हजार रुपये करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आधीच केली असल्याने याचा अर्थसंकल्पात समावेश असण्याची शक्यता आहे. याशिवाय ग्रामीण भागांत रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण, सौरऊर्जेचा वापर करणाऱ्यांना सवलती देण्याचे सूतोवाचही करण्यात आले आहे. लाडक्या बहिणींचे अनुदान १५०० रुपयांवरून २१०० रुपये करण्याचे आश्वासन महायुतीने निवडणुकीपूर्वी दिले होते. याबाबत काय घोषणा केली जाते, याची अर्थसंकल्पात उत्सुकता असेल. सुमारे अडीच कोटी महिलांना सध्या अनुदान दिले जात असून त्यासाठी वर्षाला ४६ हजार कोटींचा खर्च अपेक्षित आहे. आता लाभार्थींची संख्या नऊ लाखांनी कमी झाली आहे. मात्र तरीही दरमहा २१०० रुपये अनुदान केल्यास खर्च ६४ हजार कोटींवर जाऊ शकतो. जाहीरनाम्यातील आश्वासन पाच वर्षांच्या काळात पूर्ण करायचे असते, असे सूचक विधान मध्यंतरी महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी केले होते. त्यामुळे लाडक्या बहिणींच्या अनुदानात सरसकट १५०० रुपयांवरून २१०० रुपयांची म्हणजे ६०० रुपयांची वाढ होते की टप्प्याटप्प्याने वाढ केली जाते हे अर्थसंकल्पातून स्पष्ट होईल.

सुमारे दोन लाख कोटींची वित्तीय तूट, निवडणुकीपूर्वी सवंग निर्णयांची करण्यात आलेली खैरात यामुळे राज्याची आर्थिक परिस्थिती खालावली. यामुळेच यंदाच्या आर्थिक वर्षात फक्त ७० टक्के खर्च करून ३० टक्के कपात करावी लागली आहे. विकास कामांवरील किंवा भांडवली खर्च वाढविण्याचे भाजपचे राष्ट्रीय पातळीवरील धोरण आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात भांडवली खर्चाचे प्रमाण वाढविण्यात आले. राज्याच्या अर्थसंकल्पात भांडवली खर्च वाढविण्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा प्रयत्न असेल. सकल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत विकास कामांवरील खर्च दीड टक्काच आहे. हा खर्च वाढविण्यासाठी निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. राज्याच्या खर्चात वाढ होत असताना महसुली उत्पन्नात त्या तुलनेत वाढ होत नाही हा गंभीर प्रश्न सत्ताधाऱ्यांना भेडसावतो. राज्यावर आधीच आठ लाख कोटींपेक्षा अधिक कर्जाचा बोजा असताना आणखी किती कर्ज उभारायचे याचाही वित्तमंत्र्यांना निर्णय घ्यावा लागेल. कर्जाचे प्रमाण निकषांच्या आत असले तरी रिझर्व्ह बँकेने राज्यांच्या वाढत्या कर्जबाजारीपणाबद्दल चिंता व्यक्त केली होती.

# महाकुंभादरम्यान गंगेचे पाणी स्नानास योग्य! 'सीपीसीबी'चा नवीन अहवाल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे नुकत्याच पार पडलेल्या महाकुंभादरम्यान नद्यांचे पाणी स्नान करण्यायोग्य होते असे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (सीपीसीबी) राष्ट्रीय हरित लवादाला (एनजीटी) सांगितले आहे. यापूर्वी 'सीपीसीबी'च्या अहवालात गंगा व यमुना नद्यांच्या पाण्यात मानवी विष्ठेतील जीवाणू उच्च प्रमाणात आढळल्याचे नमूद करण्यात आले होते.

मात्र, सांख्यिकी विश्लेषणानुसार संगमाचे पाणी स्नान करण्यासाठी योग्य होते असे नवीन अहवालात म्हटले आहे.

नद्यांच्या पाण्याच्या नमुन्यांमध्ये विविधता असल्यामुळे सांख्यिकी विश्लेषण करण्यात आल्याचे 'सीपीसीबी'ने म्हटले आहे. हे नमुने वेगवेगळ्या तारखांना समान स्थानांवरून आणि एकाच दिवशी विविध स्थानांवरून अशा भिन्न पद्धतींनी घेण्यात आले होते.

त्यामुळे त्यामध्ये नदीच्या पाण्याची एकंदर गुणवत्ता प्रतिबिंबित झाली नव्हती असा दावा नवीन अहवालात करण्यात आला आहे. 'सीपीसीबी'ने हा अहवाल २८ फेब्रुवारीला तयार केला आहे.

# लाडक्या बहिणींच्या खात्यात बुधवारपर्यंत दोन महिन्यांचे पैसे, आदिती तटकरे यांचे स्पष्टीकरण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधत राज्य सरकारने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतील पात्र लाभार्थ्यांना फेब्रुवारी आणि मार्च अशा दोन महिन्याचे एकत्रित तीन हजार रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यानुसार येत्या बुधवारपर्यंत (१२ मार्च) महिलांच्या बँक खात्यात दोन महिन्यांचे पैसे जमा होणार आहेत, अशी माहिती महिला आणि बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील सर्व पात्र लाभार्थी भगिनींना फेब्रुवारी आणि मार्च महिन्याचा सन्माननिधी वितरित करण्याची प्रक्रिया शुक्रवारपासून सुरू झाली आहे.

ही प्रक्रिया दिनांक १२ मार्च पर्यंत सुरू राहणार आहे. त्यामुळे सर्व पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात फेब्रुवारी महिन्याचे १५०० रुपये आणि मार्च महिन्याचे १५०० रुपये असे दोन टप्प्यात एकूण ३००० रुपये जमा करण्याची प्रक्रिया युद्धपातळीवर सुरू आहे.

सर्व पात्र लाभार्थ्यांना दोन्ही महिन्यांचा लाभ मिळणार असून याबाबत महाराष्ट्रातील सर्व लाडक्या बहिणींनी निश्चिंत रहावे, असे तटकरे यांनी आश्वस्त केले आहे.

## महापालिका निवडणुकांसाठी आम्ही तयार; उद्धव ठाकरे यांचे सत्ताधाऱ्यांना आव्हान

## ईशान्य मुंबईत निर्धार मेळाव्याचे आयोजन

# लोकसभा निवडणुकीत गाफील राहिल्यानेच विधानसभा निवडणुकीत पराभव



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : लोकसभा निवडणुकीतील विजयामुळे गाफील राहिल्यानेच विधानसभा निवडणुकीत पराभवाला सामोरे जावे लागले. मात्र जे सत्ताधारी जिंकले ते महापालिका निवडणुका घ्यायला का घाबरत आहेत. तुम्ही जिंकला आहात तर कोणत्याही क्षणी महापालिका निवडणुका लावा, आम्ही तयार आहोत, असे आव्हान शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांना दिले.

महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या (ठाकरे) पहिल्या निर्धार मेळाव्याचे आयोजन ईशान्य मुंबईत करण्यात आले होते. यावेळी उद्धव ठाकरे यांनी भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर जोरदार टीका केली. दरम्यान, महापालिका निवडणुकांत गाफील राहू नका, असे आवाहन त्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना केले.

ज्यांचा स्वातंत्र्य लढ्याशी काडीचाही संबंध नव्हता अशा लोकांच्या हाती आज देशाची सूत्रे आहेत. पाकिस्तानविरोधात युद्ध सुरू झाले तर हे गच्चीतून देशप्रेम शिकवतात. यांच्या लाठ्या-काठ्या गच्चीवर कपडे सुकवण्यासाठी आहेत का?, असा टोला उद्धव ठाकरे यांनी रा.स्व. संघाला आणि भाजपला लगावला. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याशी काही संबंध नसताना दैवतांवरून भांडण लावणारे आता भाषेच्या मुद्द्यावरून वाद निर्माण करत आहेत, अशीही टीका त्यांनी रा. स्व. संघाचे भय्याजी जोशी यांच्या मराठीवरील विधानावर केली. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्याचा संदर्भ घेत त्यांनी धावांची चिंता नाही. पण विरोधकांची दांडी उडवणार असल्याचे ते म्हणाले.

सामना दुबईत सुरू आहे. टीव्हीवर सामना बघू शकतो. त्यासाठी दुबईत जाण्याची काय गरज? शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार मानणारे सांगणारे लोक दुबईत गेले होते. ते भारत-पाक सामना पाहात होते. फोटो काढत होते. पाकिस्तानी खेळाडू शेजारी बसले होते, असे सांगताना त्यांनी जय शाह यांचे नाव घेऊन टीका केली. त्याचवेळी उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे दुबईला गेले असते तर विरोधकांनी किती आगपाखड केली असती, अशी टीकाही त्यांनी केली.

भाजप देशप्रेमी आहे, हा खोटा प्रचार आहे. पाकिस्तान आपल्या देशासंदर्भात चांगली भूमिका घेत नाही तोपर्यंत पाकिस्तानसोबत सामना खेळू नये, ही भूमिका शिवसेना प्रमुखांची होती. बाळासाहेबांचे विचार पुढे नेतोय असे सांगणारेच भारत-पाकिस्तान मॅच बघण्यासाठी दुबईला गेले अशी टीका त्यांनी केली.

प्रयागराजला का गेलो नाही यावरही त्यांनी भाष्य केले. आपण मोहन भागवत यांचे समर्थक आहोत. ते प्रयागराजला गेले नाहीत तर आपण तरी कसे जाणार, अशी मिश्कील टीप्पणी करीत ते स्वत: जात नाहीत आणि लोकांना सांगातात, अशी टीका त्यांनी केली.

कामांना स्थगिती द्यायला आपण उद्धव ठाकरे नसल्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्याचाही त्यांनी समाचार घेतला. फडणवीस हे उद्धव ठाकरे कधीच होऊ शकणार नाहीत. कारण कामांना स्थगिती देण्यासाठी धैर्य लागते. म्हणूनच आपण आरे कारशेडला स्थगिती दिली होती. ती कारशेड धारावीत झाली असती असेही ते म्हणाले.

आपल्या राज्याचे नुकसान होऊन त्यांच्या मालकाच्या मित्राचे खिसे भरणारे उद्धव ठाकरे कधीच होऊ शकणार नाहीत, अशी टीका त्यांनी केली. यावेळी शेतकऱ्यांना कर्जमुक्त करून दाखवा, लाडक्या बहिणींना २१०० रुपये देऊन दाखवा, असे आव्हानही त्यांनी मुख्यमंत्र्यांना दिले.

मुंबई हातून गेली तर ती महाराष्ट्रापासून तुटेल. कदाचित गुजरात आणि अदानीच्या घशात घातली जाईल. मंबई आपल्याला महाराष्ट्राचीच ठेवायची आहे. त्यासाठी लढणे आणि जिंकणे गरजेचे असून मुंबई आपल्या हातून जाता कामा नये. जात-पात-धर्म आणि पक्ष विसरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या मागे उभे राहा, असे शिवसेना नेते आदित्य ठाकरे म्हणाले. लोकसभेच्या निवडणुकीनंतर आपण गाफील राहिलो म्हणून जिंकलो नाही. आपल्या मित्रपक्षांनाही सत्तेची स्वप्न पडू लागली. त्यांनीही मंत्रीपदाची जॅकेट शिवली होती. जागावाटपाच्या साटमारीत अडकलो नसतो आणि सत्तेवर असलेली विकासकामे सांगितली असती तर पराभवाला सामोरे जावे लागले नसते, असे शिवसेना ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### प्लॉटवर बेकायदेशीर केले अतिक्रमण; एकाविरुद्ध गुन्हा

सोलापूर : शांतीनगर येथे अस्तित्वात नसलेला प्लॉट असल्याचे दाखवून जागेवर बेकायदेशीर अतिक्रमण केल्याची घटना डिसेंबर २०२४ ते ४ जानेवारी २०२५ दरम्यान घडली. याप्रकरणी आरिफ इस्माईल शेख (वय- ५७, रा. रेल्वे लाईन) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून इरफान रफिक मुजावर (वय ४३, रा. शिवगंगा नगर नई जिंदगी) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, फिर्यादीच्या मालकीचा मजरेवाडी येथील जुना सर्वे नंबर २३३ नवीन सर्व्हे नंबर ४४/१ व यामध्ये बिगर शेती प्लॉट नंबर १६६ क्षेत्रफळ ५४२५ चौरस फूट पूर्व उत्तर व पश्चिम जागेवर एकूण १९०० स्केअर फुट जागेवर यातील संशयित आरोपी इरफान मुजावर यांनी अस्तित्वात नसलेला प्लॉट २४४ असल्याचे दाखवून फिर्यादीच्या जागेवर बेकायदेशीरपणे अतिक्रमण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# जिल्ह्यातील ६२ हजार घरकुलांना जप्त केलेली वाळू मोफत मिळणार

## मुख्यमंत्री शंभर दिवसाच्या कार्यक्रमांतर्गत मोफत वाळू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मुख्यमंत्री शंभर दिवस कार्यक्रमांतर्गत बेघर लाभार्थींना घरी बनण्यासाठी महसूल प्रशासनाने जप्त केलेली वाळू मोफत देण्यात येणार आहे.

यामुळे लाभार्थ्यांतून आनंद व्यक्त होत आहे गोरगरिबांना हक्काची घरे मिळावीत म्हणून घरकुल योजना मंजूर करण्यात आले आहे मात्र गेल्या अनेक वर्षापासून सोलापूर जिल्ह्यातील वाळू घाटांचा निलाव झालेला नाही त्यामुळे वाळूंची टंचाई भासत आहे त्यामुळे घरकुलांचे काम रखडलेले आहे त्याची दखल घेऊन मुख्यमंत्री शंभर दिवसाच्या कार्यक्रमांतर्गत सोलापूर जिल्ह्यातील ६२ हजार लाभार्थ्यांना



घरे पडण्यासाठी महसूल प्रशासनाने जप्त केलेली वाळू मोफत देण्यात येणार आहे.

या अगोदर तत्कालीन महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी घरकुल बांधकामासाठी सहाशे रुपये ब्रास दराने वाळू देण्याचे धोरण जाहीर केले होते मात्र याची अंमलबजावणी झाली नाही आता २०२३ चे वाळू धोरण रद्द करून नवीन २०२५ चे सुधारित वाळू धोरण आणले जाणार आहे मात्र या विलंब होणार असल्यामुळे घरकुल लाभार्थ्यांची घरे लवकर पूर्ण व्हावी त्यासाठी महसूल प्रशासनाने जप्त केलेली वाळू मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे.

जिल्ह्यात २० लाख घरकुलांना मंजुरी देण्यात आले आहे दहा लाख घरकुल लाभार्थ्यांना पहिला पंधरा हजार रुपयांचा हप्ता देण्यात आला आहे राज्यात गोरगरिबांना घरी लवकरात पूर्ण व्हावी यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष केंद्रित केले आहे.




# महिला दिन निमित्त सचिन कल्याणशेट्टी यांचे हस्ते सरपंच कल्पना सोनकांबळे सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी /प्रतिनिधी : जागतिक महिला दिनानिमित्त अक्कलकोट येथील कर्तबगार महिलांचे सन्मान सोहळा लोकप्रिय आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते सिन्नूर सरपंच कल्पना सोनकांबळे यांची सत्कार करण्यात आले .

यावेळी भाजपा मध्ये सरपंच कल्पना सोनकांबळे यांनी प्रवेश केले तुम्ही न घाबरता काम करत चला आम्ही तुमच्या पाठीशी आहे असल्याचे सांगितले.

यावेळी पत्रकार निंगप्पा निंबाळ ग्रामपंचायत सदस्य चेन्नया स्वामी भुताळी कळसगोंडा रवी जेवर्गी संगप्पा काळसगोंडा गुरुशांत कन्नी परमान्ना काळसांगोंड वृशाली भालेराव आदी महिला व सिन्नूर च्या ग्रामस्थ उपस्थित होते.

# अक्कलकोटकरांच्या लोकसेवेसाठी मनसेचे अभिनंदन

## राज ठाकरे यांच्या हस्ते रुग्णवाहिकेचे लोकार्पण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट शहर व तालुक्यातील गोरगरीब लोकांना वेळेत रुग्णवाहिकेची सोय उपलब्ध व्हावी म्हणून अक्कलकोट तालुकाध्यक्ष मल्लिनाथ पाटील,शहर संपर्क प्रमुख आदर्श मळगी,प्रभैय्या स्वामी या सर्व मनसेच्या पदाधिकारी व सहकाऱ्यांच्या वतिने अक्कलकोटकरांच्या सेवेसाठी रुग्णवाहिका उपलब्ध करून दिले.या रुग्णवाहिकेचे लोकार्पण महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले.तालुक्यात मनसेचे कौतुक होत आहे.



यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते दिलीप बापू धोत्रे,जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे,लोकसभा अध्यक्ष प्रशांत इंगळे,शहराध्यक्ष जैनुद्दीन शेख, राज्य उपाध्यक्ष अमर कुलकर्णी, अक्कलकोट मनसे ता.अध्यक्ष मल्लिनाथ पाटील, शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष जयवंत हक्के,संतोष कुमार घोडके,विश्वास गजभार,वाहतूक सेना शहर संघटक जितेंद्र टेंभुर्णीकर,रोजगार स्वंयरोजगार रोजगार जिल्हा संघटक गोविंद बंदपट्टे,प्रकाश कोळी मनोज बचुटे,पवन देसाई आदी उपस्थित होते.

# माजी जिल्हापरिषद सदस्य लक्ष्मणराव गोतसुर्वे यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आचेगांव : आचेगांव ता दक्षिण सोलापूर येथील आदर्श व्यक्तिमत्व कुंभारी जिल्हापरिषद गटातून निवडून आलेले लक्ष्मणराव गोतसुर्वे (वय -७८)यांचे शनिवार दिनांक ०८ मार्च रोजी दुपारी १२ च्या आसपास वृद्धापकाळाने राहत्या घरी आचेगांव या ठिकाणी निधन झाले.

२००२ ते २००७ या कालावधीत ते जिल्हापरिषद निवडणुकीत निवडून आले, त्यांच्या शांत, प्रामाणिकपणा, दयावान वृत्ती मुळे ते दानशूर म्हणून सर्वपरिचित होते. वडील दिवंगत आप्पाराव गोतसुर्वे हे असे पाहिले व्यक्ती होते कि ज्यांनी गांव सोडून मुंबईला जाऊन आपला स्वतःचा वेगळा दबदबा निर्माण केला होता. चखऊ चे ते मोठे आणि वजनदार कॉन्ट्रॅक्टर म्हणून आपली ओळख निर्माण



केली होती हेवढी मोठी व्यक्ती होऊन देखील त्यांनी गावाकडे कधी पाठ दाखवली नाही. मागासवर्गीय असून देखील गावासह आजू बाजूच्या पंचक्रोशीतील सर्व देवस्थान व शिक्षण संस्थांना भरीव अशी मदत त्यांनी केलेली तोच कित्ता लक्ष्मणराव गोतसुर्वे यांनी गिरवला आणि त्यांचा परिवार सुद्धा त्याच संस्कारात पुढे जात आहे म्हणून दिवंगत आप्पाराव गोतसुर्वे या नंतर माजी जिल्हापरिषद सदस्य लक्ष्मणराव गोतसुर्वे हे देखील दानशूर म्हणून परिचित होते... समाजसेवेची ही परंपरा तिसऱ्या पिढीनी प्रामुख्याने भाजप अनु जाती जिल्हासरचिटणीस बलवान गोतसुर्वे हे पुढे घेऊन जाताना दिसतात. त्यांनी सुद्धा स्वतःचे आगळे वेगळे प्रस्थ दिवंगत आजोबा आप्पाराव गोतसुर्वे यांचे कार्य डोळ्यासमोर ठेवून निर्माण केल्याचे दिसून येते.

बलवान लक्ष्मणराव गोतसुर्वे हे २००७ ला ग्रामपंचायत सदस्य, उपसरपंच, सरपंच व सध्या भाजप अनु जाती जिल्हा सरचिटणीस अश्या विविध पदावर कार्य करीत असून मोठा मुलगा भगवान लक्ष्मणराव गोतसुर्वे सलग दोन वेळा बिनविरोध आचेगांव तंटामुक्त अध्यक्ष व सलग दोन वेळा तालुक्यातील सर्वात मोठया असलेल्या स्वामी विवेकानंद पतसंस्था बिनविरोध संचालक म्हणून कार्यरत आहेत तर स्नुषा सौ गौतमी बलवान गोतसुर्वे हे देखील बिनविरोध ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्यरत आहेत.त्यामुळे गोतसुर्वे परिवाराचा संपूर्ण तालुक्यात दबदबा आहे.२००२ साली अचानक राजकारणात प्रवेश केलेल्या कालकथित लक्ष्मणराव गोतसुर्वे परिवाराने आजतगायत राजकारणात समाजसेवेशी जोडून राहिले आहेत.

त्यांच्या पच्छात ४ मुले २ मुली (सर्व विवाहित ) नातवंडे असा भला मोठा परिवार आहे. कालकथित लक्ष्मणराव गोतसुर्वे यांच्यावर उद्या रविवार दिनांक ९मार्च रोजी सकाळी १० वाजता अंत्यसंस्कार आचेगांव बौद्धस्मशान येथे होणार आहे.अश्या दानशूर व्यक्तीमत्व असलेल्या दिवंगत लक्ष्मणराव गोतसुर्वे यांना भावपूर्ण श्रद्धांजली

– प्रशांत पाटील सोलापूर
(वर्गमित्र बलवान गोतसुर्वे )

# न्हावी गावच्या ग्रामपंचायत उपसरपंचपदी निर्मला भोसले यांची निवड






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी:अतुल सोनकांबळे : दि ८-३-२०२४ रोजी इंदापूर तालुक्यातील न्हावी ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदाची निवडणूक संपन्न झाली.

सौ निर्मला तुषार भोसले यांचा ऐकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची न्हावी ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी बिनविरोध निवड करण्यात आली.

गणेश नागनाथ रासकर यांनी राजीनामा दिल्यानंतर जागा रिक्त झाली होती.

महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे इंदापूर तालुका युवक अध्यक्ष ,समाजिक कार्यकर्ते तुषार भोसले गावांमध्ये विविध सामाजिक उपक्रम राबवत असतात त्यांचे पंचक्रोशीत एक युवा नेतृत्व म्हणून नाव चांगले चर्चेत आहे.

त्यांच्या पत्नी सौ निर्मला तुषार भोसले यांनीही मागिल काही वर्षात ग्रामपंचायतीच्या माध्यमातुन अनेक विकासकामे केल्याने ही निवड करण्यात आली.

यावेळी निवडणूक अधिकारी म्हणून मा.पवार भाऊसाहेब,अध्यक्ष म्हणून सरपंच सौ आशाताई दिपक डोंबाळे यांनी योग्य रित्या कायदेशीर पद्धतीने कामकाज केले.

यावेळी महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक अध्यक्ष मा.संजयभैय्या सोनवणे, खरेदी विक्री संघाचे मा.संचालक मा. साहेबराव चोपडे, महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे इंदापूर तालुका अध्यक्ष अंगद गायकवाड, मा.सरपंच बळीभाऊ बोराटे, मा.सरपंच आप्पासाहेब डोंबाळे,पोलीस पाटील मा.प्रकाश रासकर,मा.ग्रा सदस्य मा.शरद भोसले मा.उपसरपंच सतिश मारकड, RPI नेते राजाभाऊ घाडगे, मा.बापु सरवदे, सागर देवकर -पाटील सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंढरपूर अर्बन बँकेस सहाय्यक निबंधक योगिता मुरडे यांची सदिच्छा भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर येथील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था या पदावर नियुक्त झालेल्या प्रशासकीय अधिकारी योगिता मुरडे यांचा पंढरपूर अर्बन बँकेचे चेअरमन श्री.सतीशजी मुळे व सौ.माधुरीताई जोशी यांचे हस्ते बँकेची शतसुधा ही स्मरणिका भेट देऊन स्वागत केले.



यावेळी बँकेचे संचालक अनिल अभंगराव, शांताराम कुलकर्णीसर, अमित मांगले, व्यंकटेश कौलवार, प्रभूलिंग भिंगे, गणेश शिंगण, गजेंद्र माने, हृषीकेश उत्पात, अनंत कटप, सुनील डोंबे, संचालिका सौ.संगीताताई पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे, राजेश आगवणे, गणेश हरिदास, पेंडाल आदि बँकेतील अधिकारी वर्ग तसेच सहायक निबंधक कार्यालयातील पी.बी.सावंत, सहकार अधिकारी श्रेणी-१ व एस.एस.सांगोलकर, सहकार अधिकारी श्रेणी-२ उपस्थित होते.

बँकेचे चेअरमन श्री.सतीशजी मुळे यांनी बँकेची स्थापने पासून सर्वसामान्य जनतेच्या सोयीसाठी तसेच पंढरपूर येथील जडणघडणीत स्व.सुधाकरपंत परिचारक व सध्या मा.आमदार प्रशांतराव परिचारक यांचे मार्गदर्शनाखाली बँकेचे केलेले कामांची माहिती दिली. यावेळी सहाय्यक निबंधक योगिता मुरडे यांनी बँकेच्या आर्थिक परिस्थितीची माहिती घेत समाधान व्यक्त करीत काही महत्वपुर्ण सूचनाही दिल्या. भविष्यात पंढरपूर परिसरातील सर्वच सहकारी संस्थांचे अडचणीचे प्रश्न मार्गी लावणेबाबत त्यांनी आश्वासन दिले. तसेच बँकेच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## ५,६५,६४० रुपये किमतीचा एकूण २८.२८२ किलो ग्रॅम किमतीचा गांजा मुद्देमालासह जप्त

## गुन्हा दाखल; आरोपीस अटक




# जळोली गावातील गांजा साठवणूकदार यांच्यावर करकंब पोलीस स्टेशनची कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : ०८/०३/२०२५ रोजी करकंब पोलीस ठाण्याकडील सापोनि/ श्री सागर कुंजीर यांच्या मार्गदर्शनाखाली गोपनीय बातमीदाराच्या माहितीनुसार पोलीस हवालदार आर आर जाधव व संदेश शिकतोंडे, यांना गुप्त माहिती मिळाली होती की, मौजे जळोली तालुका पंढरपूर या गावच्या शिवारातील राजेंद्र रामराव नरसाळे राहणार जरुरी तालुका पंढरपूर यांनी गांजाचा बेकायदेशीर साठा केलेला आहे. यावरून करकम पोलीस स्टेशन कडून सापोनि. सागर कुंजीरसो. यांनी डॉक्टर अर्जुन भोसले उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शंकर उमाकांत पटवारी, नेमणूक श्री विठ्ठल मंदिर सुरक्षा पथक समिती समोर पोलीस पथकाने सकाळी छापा टाकून कारवाई केली असता खालील मुद्देमाल आरोपीकडून मिळून आलेला आहे.

एकूण ५,६५,६४०/रुपये किमतीचा एकूण २८.२८२ किलो ग्रॅम किमतीचा गांजा वनस्पती पाणी फुले बोंडे, असा मुद्देमाल आरोपी राजेंद्र रामराव नरसाळे यांच्या राहत्या घरी मिळून आलेला आहे. सदरच्या प्रकरणी आरोपी राजेंद्र रामराव नरसाळे राहणार जळोळी तालुका पंढरपूर यांच्यावर गुंगीकारक औषधे व द्रव्य, आणि मनू व्यापारावर परिणाम करणारे पदार्थ, अधिनियम १९८५ चे कलम८(क)(बं)!!(क) याप्रमाणे सरकारतर्फे पोलीस हवालदार आर आर जाधव यांनी तक्रार देऊन गुन्हा दाखल केलेला आहे आरोपीला अटक केलेली आहे सदरच्या गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

मा. पोलीस अधीक्षक सो. श्री अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक सो. श्री प्रीतम यावलकर, तसेच पोलीस उपविभागीय अधिकारी पंढरपूर विभाग श्री डॉक्टर अर्जुन भोसले, यांच्या मार्गदर्शनाखाली सदरची कारवाई करण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी सापोनि. सागर कुंजीर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार/१८९७ आर आर जाधव यांनी फिरत दिलेल्या असून सदरची कारवाई मध्ये डॉक्टर अर्जुन भोसले उपविभागीय अधिकारी पंढरपूर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली. पोलीस निरीक्षक शंकर उमाकांत पटवारी श्री विठ्ठल मंदिर सुरक्षा शाखा पंढरपूर, पोलीस निरीक्षक सागर कुंजीर, पोहको.१८९७ जाधव, पोहवा./१०७० राजकर, पोहवा.२३८ सावंत,पोहवा. श्री घोळवे, पोहवा.९९० श्री भोसले, पोहवा.१५६७ श्री शिकतोंडे, पोहवा.२३८ श्री सावंत, पोको./१४३ श्री ननवरे, चापोको. डी २६ गात, चापोहेव.३१६ श्री ननवरे,सह./होम शिंदे यांनी केली आहे. पुढील तपास पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गायकवाड हे करीत आहेत.

## थोडक्यात...

### शासकीय कामात अडथळा ; एकावर गुन्हा

सोलापूर : जिल्हा न्यायालय समोर थकित बिलाचा भरणा न केल्याने वीज कनेक्शन कट का केले म्हणून एकाने वीज कर्मचाऱ्याला दमदाटी करून शासकीय कामात अडथळा आणण्याची घटना ७ मार्चला घडली. याप्रकरणी पृथ्वीराज दशरथसिंग राजपूत (वय ३२, व्यवसाय विद्युत तंत्रज्ञ, सध्या उत्तर कसबा) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून किरण बन्सीलाल परदेशी (रा. साउथ उत्तर सदर बझार) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. आहे यात अधिक माहिती अशी की, यातील विद्युत वितरण कार्यालय विभागातील ग्राहक यातील संशयित आरोपी याने थकीत बिलाचा भरणा न केल्याने त्यांचे वीज कनेक्शन कट केले. वीज कनेक्शन कट का केल्याच्या कारणावरून कार्यालयात येऊन मोठ्याने आरडाओरडा केली. तसेच ऑफिसमधील ल्युमिनियमची शिडी ऑफिस बाहेर फेकून अधिकारी आवारे यांच्याशी हुज्जत घातली. ऑफिसमधील इतर कर्मचाऱ्यांबरोबर बसले असताना संशयित आरोपीने कार्यालयाचे शटर बंद करून ये-जा करण्यास मज्जाव केला व दमलाटी करून शासकीय कामात अडथळा आणल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# जिल्हा स्तरीय महिला बचत गट उत्पादन वस्तूंचे भव्य प्रदर्शनाचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचे हस्ते उद्घाटन

## माविम ५० वा वर्धापन दिन व जागतिक महिलादिन निमित्त जिल्हास्तरीय बचत गटाचे उत्पादनाचे भव्य प्रदर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : महिला आर्थिक विकास महामंडळ, सोलापूर अंतर्गत नव-तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण उद्योम विकास प्रकल्प अंतर्गत माविम ५० वा वर्धापन दिन व जागतिक महिलां दिन निमित्त जिल्हा स्तरीय बचत गटाचे उत्पादनाचे भव्य प्रदर्शन व विक्री चे आयोजन दिनांक ८ मार्च ते १० मार्च दरम्यान आयोजित करण्यात आलेल आहे.

यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.सोलापूर, कुलदीप जंगम यांच्या हस्ते कारण्यात आले . यावेळी पोलीस अधीक्षक, (ग्रामीण) अतुल कुलकर्णी त्यांच्या धर्मपत्नी सौ. महीमा कुलकर्णी , , झडख भरोसा सेल, ग्रामीण पोलीस. सुरेखा शिंदे, जिल्हा विकास व्यवस्थापक, नाबार्ड सोलापूर नितीन शेळके, सहायक आयुक्त कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता सोलापूर संगीता खंदारे, विभागीय व्यवसाय विकास सल्लागार माविम, पुणे विभाग. सिद्धिराम माशाळे, उद्योगवर्धिनी, सोलापूर चंद्रिका चव्हाण आदी उपस्थितीत होते.

या कार्यक्रमाच्या वेळी कुलदिप जंगम यांनी बचत गटाच्या उत्पादनासाठी जिल्हास्तरावर एक स्वतंत्र दालन निर्माण करून त्या ठिकाणावरून सर्व उत्पादनाची विक्री व मार्केटिंग होईल आणि लवकरच याची सुरवात होईल असे आश्वासन दिले. सौ. कुलकर्णी मॅडम यांनी त्याच्या भाषणात महिलांन बरोबर संवाद साधताना महिला पुरुषांपेक्षा कमी नाहीत. आणि त्याही कोणत्याही कामात पुढाकाराणे पुढे आल्यास त्या कामात उच्च शिखरावर पोहचतील अशी अशा व्यक्त केली.

अतुल कुलकर्णी सर बोलताना म्हणाले पोलीस प्रशासन सदैव महिलांन सोबत आहे. महिलांना कोणत्याही अडचणी असल्यास त्यानी पोलिसांची निसंकोच संपर्क करावा असे अहवान केले व सर्वांनी विषमुक्त शेती करून आपले आपल्या कुटुंबाचे आरोग्य सुधारावे असे प्रतिपादन केले. सिद्धिराम माशाळे साहेब आपले मनोगत व्यक्त करताना माविम तर्फे चालवण्यात येणारे उपक्रम व नवतेजस्विनी प्रकल्प अंतर्गत उपप्रकल्प अंमलबजावणी बाबत मार्गदर्शन केले.

कर्यक्रमाचे प्रास्ताविक करताना जिल्हा समन्वयक अधिकारी सोमनाथ लांमगूंडे यांनी माविमची सोलापूर तालुक्यातील वाटचाल व प्रगती बाबत मनोगत व्यक्त केले. यावेळी मोहोळ तालुक्यातील बचत गट सदस्य, पदाधिकारी, लील स्टाफ,मोहोळ व माळशिरस तालुका कर्मचारी उपस्तित होते. कार्यक्रमचे सूत्रसंचालन प्रशांत गायकवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन सहायक जिल्हा समन्वय अधिकारी सतीश भारत यांनी केले.



# संविधानाप्रमाणेच प्रत्येक माणसाने महिलांचा सन्मान केला पाहिजे

### नीता भलमे यांचे प्रतिपादन : निवासी शाळेत जागतिक महिला दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




गोंदिया : दररोज पुरुष आणि स्री हे सामाजिक जडणघडणीत दोन रथाचे चाक आहेत. जसा पुरुषप्रधान परंपरा समाजात नांदते तशाच प्रकारे महिलांना सुध्दा तेवढाच सन्मान प्रत्येक माणसांनी करावा. भारताचे संविधानात जो स्रीयांना मान सन्मान आणि आदर केला तोच सन्मान केला पाहिजे. कारण प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. म्हणून संविधानाप्रमाणेच प्रत्येक माणसाने महिलांचा सन्मान केला पाहिजे. असे प्रतिपादन सहाय्यक शिक्षीका नीता भलमे यांनी केले. त्या अध्यक्ष स्थानावरुन बोलत होते.

प्रामुख्याने यावेळी मंचावर शिक्षीका नीता भलमे यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख अतिथी अस्मिता तेलंग, साधना पारधी, प्रगती खोब्रागडे, अर्चना चव्हाण, स्वाती राणा, मंजू भोंगाळे, वैशाली माहूरे, मिनाक्षी वासनिक, गीता महावत, लता साखरे, पुजा ज्ञमश्राम, आदी महिला मंचावर उपस्थित होत्या.

यावेळी प्रसंगी राजमाता जिजाऊ भोसले, शिक्षाच्या क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले, जगाची सांस्कृतिक माता रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमांना मालार्पण करण्यात आले. दीपप्रज्वलन करुन अभिवादन करण्यात आले. मंचावर असणाऱ्या प्रत्येक महिलांना मानाचा फेटा बांधून आणि भेट वस्तू व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजक म्हणून प्रास्ताविक मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांनी केले. तसेच सूत्रसंचालन वर्ग नववीचे विद्यार्थी तुषार साऊस्कार याने केले, तर आभार यश वालदे याने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रदीप ढवळे, मुन्नाभाई नंदागवळी, कार्तिक शहारे, हेमंत लाडे यांनी परिश्रम घेतले.

# डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचलित बौद्धिक अक्षम मुलांच्या शाळे तर्फे जागतिक महिला दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पनवेल/केतन भोज : ८ मार्च जागतिक महिला दिन सर्व जगभर महिलांचा सन्मान करून साजरा केला जातो.डॉ.नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांच्या शाळेत अभिनव पद्धतीने जागतिक महिला दिन साजरा केला गेला.पनवेल परिसरातील स्वतःचा व्यवसाय व कार्यक्षेत्रात आघाडीच्या भूमिका निभावणाऱ्या व समाजातील उपेक्षित घटक म्हणून दुर्लक्षित केलेल्या विशेष शाळेला मदत करणाऱ्या पाच प्रतिभा संपन्न महिलांचा सन्मान चिन्ह,सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांच्या पुनर्वसना करिता सातत्याने सहकार्य करणाऱ्या डॉ.समिधा गांधी,शाळेच्या उपक्रमात सहभागी होणाऱ्या विद्यार्थी व शिक्षक यांना प्रोत्साहन देणाऱ्या सौ.सलमा खान विद्यार्थ्यांसाठी सातत्याने उपक्रम राबविणाऱ्या इनरव्हील क्लबच्या डॉ. वीणा मनोहर मॅडम,विद्यार्थ्यांना शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमाच्या वेळेस वैयक्तिक व रोटरी क्लबच्या मार्फत खाऊ वाटप करणाऱ्या दीपा पंजाबी मॅडम, विद्यार्थी व पालक यांच्यासाठी शिबीर व कार्यशाळा यांना सहकार्य करणाऱ्या लायन्स क्लबच्या चंद्रा बोरा मॅडम, या कर्तबगार महिलांचा त्यांच्या कार्यस्थळी जाऊन त्या करत असलेल्या कार्यासाठी तसेच विशेष शाळेसाठी करत असलेल्या मदतीसाठी कृतज्ञतेच्या भावनेतून शाळेच्या विद्यार्थिनी व महिला कर्मचारी यांनी डॉ.नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन तर्फे महिला दिनाच्या शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला.



# कामचुकार ग्रामसेवकांवर कारवाई करण्याची रिपाइंची मागणी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/तालुका प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यात अनेक गावचे ग्रामसेवक हे गावातील नागरिकांना वेळेवर भेटत नाहीत. तसेच शासकीय योजनांची अंमलबजावणी करण्यात कामचुकार करीत असल्याने अनेक गावांचा विकास रखडला आहे. तरी अशा कामचुकार ग्रामसेवकांवर निलंबनाची कारवाई करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन रिपाईचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोटचे गटविकास अधिकारी शंकर कवितके यांना देण्यात आले. यावेळी रिपाईचे अक्कलकोट तालुका कार्याध्यक्ष राजेभाई बोरगावकर, सचिव राजू भगळे, युवक अध्यक्ष अप्पा भालेराव,बबलाद सरपंच बाबु निरगुडे,गौडगाव ग्रामपंचायत सदस्य दत्ता सोनकांबळे,शहर कोषाध्यक्ष सुरेश गायकवाड, दयानंद सोनकांबळे,तम्मा दसाडे आदी उपस्थित होते. मौजे खानापूर येथील गावातील अनेक कामे प्रलंबित आहेत.गेल्या आठ दिवसांपासून पाणी पुरवठा बंद आहे. ग्रामपंचायत कार्यालय मंजूर होऊन आठ महिने झाले तरी टेंडर काढले नाही. भिमनगर येथे दहा लाख मंजूर असून त्याचे देखील टेंडर काढले नाहीत. गेल्या दोन महिन्यांपासून मासीक सभा तसेच ग्रामसभा घेतले नाही.गेल्या आठ महिन्यांपासून ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांचे पगार नाहीत. प्रधानमंत्री आवास योजनेचे करारनामा करण्यात वेळेवर ग्रामसेवक उपस्थित राहत नाहीत. विशेष म्हणजे तालुक्यातील अनेक ग्रामसेवक ठेकेदारी करण्यात मग्न आहेत. तरी अशा ग्रामसेवकांवर कारवाई करावी अशी मागणी रिपाईच्या वतीने करण्यात आली आहे.

# महिलांनी स्वत:च्या आरोग्याकडे अधिक लक्ष द्यावे : शिक्षण विस्तार अधिकारी मैनाबाई मुळे

### जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा माळकरंजा येथे आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब : सुधाकर रणदिवे, आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त कळंब तालुक्यातील मौजे माळकरंजा येथील जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळेत यावर्षी प्रथमच एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला. प्राथमिक आरोग्य केंद्र मंगरूळ येथील तज्ञ डॉक्टरांच्या सहकार्याने तसेच गावातील ग्रामपंचायत, शालेय व्यवस्थापन समिती व विविध महिला बचत गट आणि आशा कार्यकर्ती व अंगणवाडी सेविका या सर्वांच्या सहकार्याने शाळेत गावातील सर्व महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.



शाळेतील उपक्रमशील शिक्षिका श्रीमती भारती सूर्यवंशी,मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी कुमारी मंजुश्री नारायण कराड, सहशिक्षक श्री हनुमंत रामभाऊ घाडगे, श्री मकरंद नाडे यांच्या प्रयत्नातून शाळेचे मुख्याध्यापक श्री संतोष भोजने यांच्या मार्गदर्शनात यावर्षी शाळेत प्रथमच महिला दिनाचे मोठ्या प्रमाणात आयोजन करून याप्रसंगी गावातील महिलांच्या आरोग्याची तपासणी व आरोग्य विषयक जनजागृती मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन गोविंदपुर बीटच्या शिक्षण विस्ताराधिकारी श्रीमती मैनाबाई मुळे मॅडम यांनी केले. प्राथमिक आरोग्य केंद्र मंगरूळ येथील मेडिकल ऑफिसर डॉ.श्री.धनंजय चाळक व त्यांचे सहकारी समुदाय आरोग्य अधिकारी श्रीमती शितल दळवी मॅडम , आरोग्य सेविका श्रीमती काळे मॅडम,आरोग्य सेवक श्री.अशोक कुनघाडकर, वैज्ञानिक प्रयोग शाळा अधिकारी ऋषिकेश नान्नजकर, रविंद्र मैंदाड,यांच्या सहकार्याने मौजे माळकरंजा येथील जवळपास १०० महिलांच्या विविध तपासण्या करण्यात आल्या. यामध्ये प्रामुख्याने थायरॉईड, मधुमेह, रक्तदाब , किडणी,लिव्हर,चरबी, एच बी वन सी वन, कॅन्सर वगैरे चाचण्या करण्यात आल्या व महिलांनी आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यावे, आपले आरोग्य ठीक तर कुटुंब ठीक याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास गावातील नरसिंह सेंद्रिय महिला बचत गट अध्यक्षा श्रीमती उमा नेताजी कराड सी आर पी श्रीमती संगीता बालासाहेब बिक्कड, अंगणवाडी कार्यकर्ती श्रीमती शालिनीताई सोनावणे अंगणवाडी मदतनीस आशा कार्यकर्ती जयश्री कुलकर्णी आणि सुवर्णा जाधव,शालेय समितीचे अध्यक्ष शरद जी गालट उपसरपंच श्रीमती दिपाली गालट यांच्यासह अनेक नागरिक महिला भगिनींनी सदर कार्यक्रमास उपस्थिती लावली.

**डॉ. सुधीर रसाळ यांचा मराठीसाठी तर डॉ.दिलीप झवेरी यांचा गुजराती साहित्यकृतीसाठी केला गौरव**

**साहित्य अकादमी पुरस्कार वितरण सोहळा**

# महाराष्ट्रातील दोन साहित्यिकांचा प्रतिष्ठित साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : मराठीतील ज्येष्ठ समीक्षक आणि लेखक डॉ. सुधीर रसाळ यांना त्यांच्या समीक्षात्मक ग्रंथ ‘विंदांचे गद्यरूप’ यासाठी तर गुजराती भाषेसाठी दिलीप झवेरी यांना त्यांच्या 'भगवानननी वातो' या कवितासंग्रहासाठी प्रतिष्ठित साहित्य अकादमी पुरस्काराने आज सन्मानित करण्यात आले.

येथील कमानी ऑडिटोरियममध्ये ' साहित्य अकादमी पुरस्कार २०२४ अर्पण' सोहळ्याचे दिमाखदार आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रख्यात नाटककार आणि लेखक महेश दत्तानी प्रमुख पाहुणे म्हणून, तर साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक, उपाध्यक्ष कुसुम शर्मा, तसेच सचिव के. श्रीनिवासराव व्यासपीठावर तसेच विविध भाषेतील साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त मान्यवरांसोबत उपस्थित होते. पुरस्काराच्या स्वरूपात ताम्रपत्र, शाल आणि रुपये एक लाख रोख रक्कम प्रदान केली जाते.

आज झालेल्या पुरस्कार वितरणाच्या कार्यक्रमात २३ प्रादेशिक भाषांमधील नामांकित साहित्यिकांच्या साहित्यकृतीला गौरवण्यात आले.

**विंदांचे गद्यरुप या पुस्तकाविषयी**

मराठी साहित्य क्षेत्रातील ज्येष्ठ समीक्षक डॉ.सुधीर रसाळ यांच्या विंदाचे गद्यरुप या समीक्षात्मक पुस्तकात प्रख्यात मराठी कवी आणि समीक्षक विंदा करंदीकर यांच्या समीक्षात्मक लेखनावर सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे.

**ज्येष्ठ समीक्षक आणि लेखक डॉ.सुधीर रसाळ यांच्या विषयी**

डॉ.सुधीर रसाळ हे मराठीतील मान्यवर समीक्षक आणि लेखक आहेत. त्यांनी १९५६ पासून मराठी वाङ्मयाची समीक्षा करत उल्लेखनीय योगदान दिले आहे. दिल्लीच्या साहित्य अकादमीमध्ये मराठीचे प्रतिनिधित्व करणारे रसाळ हे औरंगाबाद विद्यापीठाच्या मराठी भाषा व वाङ्मय विभागाचे १९९० ते १९९३ या काळात प्रमुख होते. साहित्य लेखन, समीक्षा आणि संपादन या क्षेत्रांत त्यांचा हातखंडा आहे.

**कवी, लेखक दिलीप झवेरी लिखित 'भगवानननी वातो' कवितासंग्रह विषयी**

गुजराती भाषेचे ज्येष्ठ कवी लेखक आणि समीक्षक दिलीप झवेरी यांचा जन्म मुंबईतील असून ते ठाणे येथे स्थायिक झाले आहेत.

'भगवानननी वातोव हा गुजराती भाषेतील १६ पृथक्क गद्य कवितासंग्रह संग्रह असूनही एकच लांब कविता आहे. या कवितासंग्रहामध्ये ईश्वरा बद्दल जटिल कोलाज मांडलेले असल्याने हा गंभीर केंद्रीय विषय आहे. हा कवितासंग्रह नाजूकपणे रोजच्या बोली भाषेत मांडलेला आहे. या कविता संग्रहामध्ये संपूर्ण ब्रह्मांडाला एकत्रित करण्याचा प्रयत्न आहे यामध्ये राजकीय व्यवस्था, विज्ञान, इतिहास भूतकाळ आणि वर्तमानका यांचे एकत्रित मिलाफ करून कविता गुंफले आहेत.

कोकणी भाषेसाठी लेखक नाटककार समालोचक आणि अनुवादक मुकेश थळी यांना त्यांच्या 'रंगतरंग ' निबंध संग्रहासाठी आज साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

रंगतरंग या निबंध संग्रहात एकूण २४ वेगवेगळ्या विषयांवर निबंध लिहिलेले आहेत. या निबंधाची भाषा अत्यंत काव्यात्मक सुंदर तथा सहज स्पष्ट आणि आकर्षक अशी आहे यामध्ये म्हणी वाक्यप्रचार यांचा उपयोग करण्यात आला असून जी वाचकांना चकित करते.

साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त सर्वच सन्मानित साहित्यिक उद्या साहित्य अकादमी परिसरातील नर्मदा या सभागृहात सकाळी दहा वाजता त्यांच्या पुरस्कार प्राप्त साहित्य विषयी संवाद साधतील.